# प्रकरण – तिसरे

# पन्हाळयासाठी मोगल–मराठा संघर्ष

# (१६७४–१७१०)

# प्रकरण – तिसरे

# पन्हाळयासाठी मोगल–मराठा संघर्ष (१६७४–१७१०)

**प्रस्तावना :–**

शिवरायांच्या कारकीर्दीत राज्याच्या संरक्षण व्यवस्थेत किल्ल्यांना फार महत्व प्राप्त झाले होते. शिवरायांची मुख्य भिस्त किल्ल्यावरच होती. शिवरायांनी सतराव्या शतकात अतिशय प्रतिकूल परिस्थितीत स्वराज्याची स्थापना केली. व त्यात वाढ ही केली, या कामी त्यांना डोंगरी किल्ल्यांचे सहाय्य मोठया प्रमाणात लाभले. अशाच डोंगरी किल्ल्यांपैकी दक्षिण महाराष्ट्रातील महत्वाचा किल्ला म्हणजे पन्हाळगड होय.

इ. स. १६७३ मध्ये अण्णाजी पंताने विजापूरच्या अदिलशहाकडून पन्हाळगडाचा ताबा मिळवला. यानंतर पन्हाळगडाच्या संदर्भातील घटना म्हणजे नेसरीची लढाई, शिवकाळातील संभाजीराजांचे पन्हाळगडावरील वास्तव्य, शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी राजांच्या पन्हाळयावरील हालचाली, पन्हाळयावर छ. संभाजीना विष घालून मारण्याचा कट, छ. संभाजी–औरंगजेब संघर्ष, संभाजी महाराज व थोरातांची कमळा, राजारामाचे मंचकारोहण, महाराणी ताराबाई–मराठयांचे स्वातंत्र्ययुध्द, इ. स. १७०१–१७०२ चा पन्हाळयावरील संघर्ष, छ. शाहू–ताराबाई संघर्ष, पन्हाळा मराठयांच्या राजधानीचे ठिकाण इत्यादी घटनांची चर्चा या प्रकरणात केली आहे.

शिवाजी महाराजांनी 'पन्हाळागडा' चा ताबा मिळवल्यावर मराठयांचे सामर्थ्य आणखी वाढले. यास पायबंद घालण्यासाठी म्हणून विजापूरच्या अदिलशाहीचा मुख्य कारभारी खवासखान याने 'अब्दुल करीम' याची मोठया सैन्यासह पन्हाळा व आसपासचा प्रदेश ताब्यात आणण्यास रवानगी केली. त्यानुसार अब्दुल करीम याने पन्हाळयाचा आसपासचा प्रदेश ताब्यात आणला, व पन्हाळयास वेढा देण्याची तयारी सुरु केली. यावेळी शिवाजी महाराजांनी वेगळीच युध्दनिती अवलंबली पन्हाळगडाचा वेढा उठविण्याचा प्रयत्न न करता, प्रतापरावास विजापूरच्या आसपासचा प्रदेश ताब्यात घेण्यास पाठविले. त्यानुसार प्रतापरावाने विजापूरकरांस इतके हैराण केले की, त्यामुळे खवासखानास अब्दुल करीम यास परत बोलावणे भाग पडले. पण सेनापती प्रतापराव

गुजर याने या फौजेची मिरज व विजापूर या दरम्यान अडवणूक केली होती. पण त्याचा पूर्ण निःपात न करता त्याला परत जावू दिले.[१]

## नेसरीची लढाई :–

प्रतापरावाने खवासखानास सोडून दिल्याने शिवाजी राजांचा त्याच्यावर रोष झाला. यानंतर प्रतापरावाने हुबळी–कोल्हापूरच्या प्रदेशात आपला वचक निर्माण केला. व त्याने दक्षिणेकडील हुबळीची पेठ लुटली. पण मुजफ्फरखानाने स्वारी केल्याने लूटीचे काम अर्धवट सोडून प्रतापरावास परत यावे लागले. याचवेळी विजापूरचा मुख्य कारभारी 'बहलोलखान' याने कोल्हापूरात आश्रय घेतला. व तेथून तो पन्हाळा, राजापूर, कोंकण या प्रदेशातील मराठयांचा अंमल उठविण्याच्या प्रयत्नात लागला. पुढे बहलोलखानास प्रतापरावाने नेसरीच्या खिंडीत गाठले येथे दोघाच्यांत संघर्ष घडून आला. पण कमी सैन्याच्या अभावी या लढाईत प्रतापरावांचा मृत्यू झाला.[२] हीच प्रसिध्द नेसरीची लढाई इ. स. १६७४ मध्ये घडली.

शिवाजी महाराज कर्नाटकच्या मोहिमेवर असताना, अण्णाजी पंताकडे पन्हाळगड व पन्हाळगडाच्या आसपासच्या प्रदेशाची जबाबदारी होती. पण अण्णाजी पंत ही जबाबदारी पेलण्यास असमर्थ ठरला. तसेच सिद्दीचा बंदोबस्त करण्यात अयशस्वी ठरल्याने शिवाजी राजांनी कर्नाटक मोहिमेवर हंबीररावास मागे ठेवून आपण पन्हाळगडास परतले.

यानंतर महाराजांनी पन्हाळगडावर जवळ जवळ एक वर्ष वास्तव्य केले. समशेरखान व इतर अदिलशाही सरदारांनी गोवा कारवार येथील बराच प्रदेश घेतला. व शिवाजी राजांच्या सैन्याचा ही एक दोन लढाईत पराभव केला. यावेळी शिवाजी महाराजांनी सर्व सैन्याला पन्हाळयाला जमण्याचा हुकूम दिला होता.[3] शिवाजी राजांच्या सैन्यांचा एक–दोन लढाईत पराभव झाला. त्याचा उल्लेख कारवारच्या इंग्रजांनी आपल्या २ डिसेंबरच्या पत्रात असा करतात, 'जर विजापूरी सेनापतींनी दोन लढायांत दाखविलेल्या सुरुवाती सारखा जोर धरला तर शिवाजीराजांचा सहज पराभव करतील. पहिला लढा लक्ष्मीश्वराजवळ जमशिदखानाने सहा हजार स्वारानिशी दिला.

राजांजवळील ६ हजार स्वार व १२ हजार पायदळ होते. परंतू राजांना पन्हाळयाकडे माघार घ्यावयास लाविली. ...[४] पण पन्हाळगडाचा ताबा शिवाजी राजांकडेच राहिला. मोगलांनी व अदिलशाहीच्या सैन्यांने पन्हाळगडाचा ताबा मिळविण्यासाठी सतत प्रयत्न केले होते.

शिवाजीराजे ही पन्हाळगडावर राहून कारभार पाहत असत. रायगडापेक्षा काही गोष्टीत शिवाजीराजांना बाहय प्रदेशाशी संबंध ठेवण्यास पन्हाळगड जास्त उपयुक्त होता. अदिलशाहीच्या व कर्नाटक प्रातांच्या आसपासच्या भागावर नियंत्रण ठेवण्यासाठी महत्वाचा होता. म्हणून छ. शिवाजीपासून ताराबाई पर्यंत पन्हाळा हीच एका अर्थाने छत्रपतीची राजधानी होती.[५] शिवाजी महाराजांनी पन्हाळयाला सुभ्याचे ठिकाण केले व त्याच्या अंमलाखाली दहा तालुके नेमून दिले.

## शिवछत्रपतींच्या काळातील संभाजीराजांचे पन्हाळयावरील वास्तव्य :—

शिवाजी राजांचे थोरले चिरंजीव म्हणजे 'संभाजी' होय. शिवाजी राजांबरोबर छ. संभाजी उत्तर भारतात गेला असता, तिकडील बडेजाव, थाटमाट, ऐषआराम यांचा संभाजी राजांवर प्रभाव पडला असावा. इ. स. १६७२—७३ मध्ये संभाजी राजांना राज्यकारभारात गुंतवण्यात आले. त्यावेळी विजापूरकरांशी मराठयांचा संघर्ष सुरु होता. त्यात संभाजी राजांकडे मुख्य कामगिरी देऊन त्यांच्या सहाय्यास अण्णाजी पंताला नेमण्यात आले. तेंव्हापासूनच संभाजी महाराजांचे वास्तव्य पन्हाळयास होते.[६] यानंतर संभाजी राजांचे वास्तव्य बराच काळ पन्हाळयाला राहिल्याचे संदर्भ मिळतात.

संभाजी राजांचा स्वभाव काहिसा रागीट व लहरी बनला होता. जिजाबाईच्या मृत्यूनंतर संभाजी राजांची वृत्ती आणखी बदलली.[७] सज्जनगडाहून निघून संभाजीराजे मोगलांना मिळाले. संभाजीराजे व दिलेरखान एकत्र आल्यावर मराठी मुलुखातील प्रदेश जिंकावयास सुरुवात केली. याच दरम्यान शहाजादा 'मुअज्जमला' दक्षिणेचा सुभेदार म्हणून नेमण्यात आले. तो एप्रिल—मे १६७९ च्या सुमारास औरंगाबादेस आला. यानंतर मुघल सैन्य, दिलेरखान आणि संभाजीराजे पन्हाळयाला वेढा घालणार होते. तेथे पावसाळयात छावणी करुन दीर्घ काळापर्यंत वेढा चालू ठेवण्याचा विचार होता. छ.

संभाजी आणि दिलेरखान यांनी पावसाळा संपताच विजापूरच्या वजिरांना शिवाजी महाराजांवर चालून येण्यास भाग पाडले. त्याला तोंड देण्यास शिवाजी महाराजांनी सरहद्दीवर १२००० घोडेस्वार आणून ठेवले होते. परंतु प्रत्यक्षात पन्हाळयाला वेढा पडला नाही.[८]

'गोवळकोंडा' व 'विजापूर' या दोन्ही ठिकाणी दिलेरखानाचे उद्योग फसल्यामुळे औरंगजेब बादशहाची त्याच्यावर नाराजी झाली. त्यांनी त्यास परत बोलावून घेतले. व बहादूरखानाकडे संभाजीराजांना कैद करण्याचा निरोप पाठविण्यात आला. याची माहिती संभाजीराजांना असावी. तसेच शिवाजी महाराजांचे ही संभाजीराजांना परत आणण्याचे प्रयत्न सुरु होते. शेवटी २० नोव्हेंबर १६७९ रोजी अथणीहून येसूबाईस पुरुषाचा पोशाख देऊन, तिच्यासह दहा स्वारांनिशी संभाजीराजे गुप्तपणे पळून विजापूरास मसूदखानाच्या आश्रयास आले. याच काळात संभाजीराजांना आणण्यास शिवाजी महाराजांची लष्करी तुकडी विजापूराजवळ आली होती. ही संधी साधून संभाजीराजे ३० नोव्हेंबर १६७९ रोजी रात्री विजापूरातून गुप्त निघून शिवाजीराजांनी पाठविलेल्या सैन्याबरोबर ४ डिसेंबर रोजी पन्हाळयास दाखल झाले.[९]

संभाजीराजे पन्हाळयास आल्यावर शिवाजी महाराजांची व संभाजीराजांची भेट १३ जानेवारी १६८० रोजी पन्हाळयास झाली. शिवाजीराजांनी प्रेमाने संभाजीराजांचा सत्कार करुन राज्य देण्याचे आश्वासन दिले. संभाजीला पन्हाळयाला ठेवून शिवाजीराजे रायगडाला परतले. १५ मार्च १६८० रोजी शिवाजीराजांनी राजारामाचे प्रतापराव गुजर यांच्या मुलीशी लग्न केले. यावेळी संभाजीला रायगडावर न नेता पन्हाळयास ठेवले होते.[१०]

दत्ताजी पंताच्या मृत्युमुळे त्यांचा कोल्हापूरकडील दक्षिण प्रांताचा सरसुभा अण्णाजीला दिला. संभाजीराजांना पन्हाळा प्रभावली दाभोळचा सरसुभा देऊन, त्यांचेजवळ जनार्दनपंत हणमंत यास सरकारकून पद देऊन ठेविले. संताजी घोरपडे यांचे वडील 'म्हालोजी घोरपडे' हे शिवाजीराजांकडे चाकरीस होते. त्यास शिवाजीराजांनी पन्हाळा किल्ल्याची सरनोबती दिली. व त्यास संभाजीराजांकडे ठेवण्यात आले. शिवाजीराजे व संभाजीच्या भेटीनंतर राजापूरच्या बंदरातील जहाजावर

संभाजीराजांना हक्क मिळाला होता, पण संभाजीराजांनी मोगलांच्या हालचालीमुळे आपल्या सुभ्याची मुख्य कचेरी अण्णाजीपंता प्रमाणे राजापूरास न ठेवता पन्हाळयास ठेवली होती.[११]

शिवाजीराजांनी मोगलांच्या आक्रमणास तोंड देण्यासाठी संभाजी परत आल्यावर त्यास पन्हाळयास ठेवून मोगली सैन्यावर दहशत बसविण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

संभाजीराजे परत आले तरी त्यास पुन्हा हस्तगत करण्याचे दिलेरखानाचे प्रयत्न चालल्याचे दिसतात. संभाजीराजांना आपल्या बाजूला वळवून घेऊन ही मराठयांवर नियंत्रण प्राप्त करु न शकल्याने, दिलेरखानावर बादशहाची नाराजी होती. दिलेरखान पन्हाळयावर आक्रमणासाठी येत आहे याची बातमी कळाल्याने शिवाजीराजांनी पन्हाळयाच्या सुरक्षेसाठी वेगवेगळया किल्ल्यातून तोफा आणून त्या पन्हाळयावर चढविल्या होत्या.[१२] याचा उल्लेख राजापूरचे इंग्रज ३० डिसेंबर (१६७९) च्या पत्रात असा करतात...... शिवाजी आता पन्हाळयाकडे जात आहे...... शिवाजीने पन्हाळयावर पुष्कळ मजबूती केली आहे. कोकणातील बऱ्याच किल्ल्यांतील तोफा काढून आणून पन्हाळयावर चढविल्या जात आहेत. त्याशिवाय फ्रेंचाकडून ४० मोठया तोफा विकत घेतल्या असून त्याही रोज खटपट करुन पन्हाळयावर नेत आहेत..... [१३] २४ नोव्हेंबर १६७९ रोजी अण्णाजी दत्तोचा भाऊ सोमाजी यास अंकोला, कारवार, सोमेश्वर, फोंडा इत्यादी ठिकाणच्या तोफा पन्हाळयावर आणण्याचा हुकूम शिवाजी महाराजांनी दिला होता. तसेच डिसेंबरमध्ये शिवाजीराजांच्या दुसऱ्या फौजेने खानदेशांत बऱ्हाणपूर पर्यंतचा प्रदेश लुटून नेला. दिलेरखानाची सर्वच बाजूने कोंडी झाल्याने त्याजकडून मराठयांना काही उपसर्ग घडू शकला नाही.[१४]

## शिवछत्रपतीच्या मृत्यूनंतर संभाजीराजांच्या पन्हाळयावरील हालचाली :–

शिवाजीराजांनी राजारामाची मुंज व प्रतापराव गुजर यांच्या मुलीशी राजारामाचा विवाह सोहळा रायगडावर पार पाडला. त्यानंतर आठ दिवसांनी २३ मार्च रोजी शिवाजीराजांचा ताप वाढला, राजांनी मातब्बर सरदारांना बोलावून घेतले.

संभाजीराजांना ही पन्हाळयावर आजाराची बातमी दिली, पण संभाजीराजे येऊ शकले नाहीत. महाराजांचा मृत्यू ३ एप्रिल १६८० रोजी रायगड येथे झाला. यानंतर मराठयांचे छत्रपतीपद मिळवण्यासाठी राजाराम महाराजांचे आणि संभाजीराजांचे प्रयत्न चालल्याचे दिसतात.[१५]

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर २१ एप्रिल १६८० रोजी अण्णाजी पंत सुरनिस सचीव यांनी राजारामाचे मंचकारोहण उरकून घेतले, व संभाजीराजे यास कैद करावे असा तह करण्यात आला. सोयराबाईच्या नेतृत्वाखाली हा कट रचला गेला असावा. मोरोपंत आणि अण्णाजी सैन्यासह पन्हाळयास जाण्यास निघाले. महाराजांच्या निधनाची बातमी सोयराबाईने गुप्त ठेवण्याचा प्रयत्न केला होता, तरी संभाजीराजांना ही बातमी कळाल्यावर त्यांनी महाराजांचे श्राध्दविधी पन्हाळयावर उरकले. संभाजी व राजारामाच्या संघर्षात संभाजीराजांचा पक्ष मजबूत होत गेला.[१६] यानंतर संभाजीराजांनी राजापूर, कुडाळकडील कमाविसदारांस पत्रे पाठवून, आपल्या पक्षात समाविष्ठ करुन घेतले.[१७] व येथे असलेले धान्य पन्हाळयावर आणण्यात आले. संभाजीराजांनी पन्हाळगडावर राज्यकारभार हाती घेण्यास तयारी चालविली होती. संभाजी राजांनी एप्रिल १६८० च्या दरम्यान कारभार आपल्या हाती घेतला. आणि सुभेदार, हवलदार इत्यादी अधिकाऱ्यांना आपल्या पक्षात समाविष्ठ करुन घेतले.

संभाजीराजांना पकडण्यासाठी रायगडावर झालेल्या वाटाघाटीचा सुगावा संभाजीराजांना लागला असावा, कारण अण्णाजी दत्तो व मोरोपंत यांनी ज्या गुप्तहेरांमार्फत पन्हाळयाच्या अधिकाऱ्यांना संभाजीना कैद करण्यास पत्रे देण्यासाठी पाठविले होते. त्यांनाच संभाजीराजांनी एप्रिल १६८० च्या सुमारास कैद केले. रायगडावरील या कटात पन्हाळयावरील जे अधिकारी सामील झाले, त्यापैकी काहीजणांना कैद करुन काहींना कामावरुन दूर केले.

सेनापती हंबीररावाने अण्णाजी, मोरोपंत, प्रल्हाद यांना कैद करुन पन्हाळयास पाठविले. अण्णाजी व मोरोपंत यांना कैदेत ठेवले, प्रल्हादपंत मात्र सुटला; पिलाजी शिर्केने रायगडचा बंदोबस्त केल्यावर संभाजीराजांनी रायगडला जाण्याचे ठरविले.[१८] संभाजीराजांनी 'म्हालोजी घोरपडे' यास सरनोबताची वस्त्रे दिली, आणि त्यास किल्ले

पन्हाळयास ठेवून आपण १८ जून १६८० ला रायगडावर गेले. यानंतर संभाजीराजांनी रायगडावर राजारामाला वस्त्रे भूषणे देऊन सत्कार केला असे कवी परमानंद यांनी आपल्या काव्यात म्हटले आहे. राजारामाला नजर कैदेत ठेवले असले तरी संभाजी महाराजांनी त्यांना प्रेमाने वागविले होते. यानंतर संभाजीराजांनी २० जुलै १६८० रोजी स्वतःचा मंचकारोहण करुन घेतला. संभाजी महाराजांचा राज्याभिषेक १६ जानेवारी १६८१ रोजी रायगडावर पार पडला.[१९]

इ. स. १६७८ मध्ये घडलेल्या राजकिय घटनांमुळे औरंगजेब आणि त्याचा चौथा मुलगा सुलतान अकबर यांचे संबंध बिघडले. अशात इ. स. १६८० मध्ये रजपूतांनी औरंगजेबा विरुध्द बंड उभारले. यात अकबराकडे चित्तोडची बाजू सांभाळण्यास दिली होती. पण त्याला त्यात अपयश आले. याच घटनेतून अकबराचे व औरंगजेबाचे संबंध बिघडले, त्यामुळे अकबराने औरंगजेबाविरुध्द बंड उभारले व अकबर मराठयांच्या आश्रयास आला. पण संभाजीराजांनी अकबराच्या हेतूची खात्री होईपर्यंत अकबराची भेट घेण्यास दिरंगाई केली.[२०]

**पन्हाळयावर संभाजी महाराजांना विष घालून मारण्याचा कट :–**

अकबराच्या आगमनाचा फायदा घेऊन अण्णाजी दत्तो व इतर मंडळीनी संभाजीराजे विरुध्द कारस्थाने सुरु केली. यात पन्हाळयावर संभाजी महाराजांना विष घालून ठार मारण्याचा कट जुन–जुलै १६८१ च्या दरम्यान झाला होता. या कटात अण्णाजी दत्तो, सोमाजी दत्तो, हिरोजी फर्जद, सोयराबाई इत्यादी मंडळीचा सहभाग होता. त्यांनी या कटात अकबराला ही गोवण्याचा प्रयत्न केला होता. उलटपक्षी अकबरानेच संभाजीकडे दूत पाठवून या कटाची बातमी दिली. विष प्रयोगाचा कट फसल्यावर याच मंडळीनी अकबराच्या मदतीने संभाजी महाराजांना गादीवरुन काढून टाकण्याचा प्रयत्न केला. या कटास अकबर सुरुवातीस मदत करावयास तयार होता पण दुर्गादासाच्या सल्ल्याने त्याने या कटास नकार दिला.[२१] या कटात पन्हाळा व रायगडची मंडळी सापडली व मारली गेली.

अशा प्रकारे पन्हाळयावर संभाजी महाराजांना मारण्याचा प्रयत्न झाला होता. पण तो अकबराच्या मदतीने उघडकीस आला.

मराठयांच्या साम्राज्यावर संभाजीराजे अधिष्ठित झाले त्यावेळच्या राज्याचा भौगोलिक विस्तार बराच मोठा होता. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला, तेंव्हा कल्याण ते फोंडयापर्यंतचा कोकणपट्टीचा भाग हिंदवी स्वराज्यात होता. त्यामुळे रायगड हे मध्यवर्ती ठिकाण मानले गेले. परंतु त्यानंतर राज्याच्या विस्तारात उत्तरेस दमण, बागलाण व दक्षिणेस अदोनी फोंडयापर्यंतचा व कर्नाटकातील काही प्रदेश ही समाविष्ठ झाला होता. रायगड ही राजधानी मुलकी व इतर कारभाराला व संरक्षणाच्या दुष्टीने सोयीची होती, तरी विस्तारासाठी फौजेच्या संग्रहास व परराज्याच्या आक्रमणास पायबंद ठेवण्याच्या दृष्टीने राजमार्ग व सरहद्द यांचा फायदा रायगडास मिळत नव्हता. या दृष्टीने पन्हाळगड मध्यवर्ती ठिकाण असल्याने संभाजीराजे व हंबीरराव यांना शत्रूवर आपले वर्चस्व व अंमल ठेवता यावा म्हणून पन्हाळगडावर किंवा त्याच्या आसपासच्या प्रदेशात राहणे हे भाग होते.[२२] संभाजीराजांच्या काळात पन्हाळगडाला जास्तच महत्व निर्माण झाले.

## संभाजीराजे व औरंगजेब यांचा संघर्ष :—

संभाजी महाराजांचे राज्य नष्ट करण्यासाठी औरंगजेबाने इ. स. १६८२ पासूनच एकाच वेळी अनेक आघाडया उघडल्या होत्या. यात पहिली आघाडी उत्तर भागात तर दुसरी आघाडी स्वराज्याच्या मध्यभागात आणि तिसरी स्वराज्याच्या दक्षिण भागात होती. तिसऱ्या आघाडीची सुरुवात सुलतान आज्जमने केली. इ. स. १६८२ ला जानेवारीत पन्हाळा व कोल्हापूर या भागात स्वारी करण्यास रवाना झाला. आज्जम पन्हाळयापासून सहा कोसावर असतांना सेनापती हंबीरराव याने १५००० घोडदळ व ५००० पायदळासह त्याच्यावर आक्रमण केले. पण या संघर्षात मराठयांचा पराभव झाला.

इ. स. १६८६ मध्ये मिरज, कोल्हापूर व पन्हाळा या भागात मुघलांच्या आक्रमक हालचाली सुरु झाल्या होत्या. १५ मार्च ते १२ एप्रिल १६८६ या काळात मुघलांनी

मिरजेचा ताबा मिळवला. त्यामुळे मुघलांना याठिकाणी आश्रयास ठिकाण मिळाले. यानंतर मुघलांच्या सैन्याने पन्हाळा, कोल्हापूर व बेळगाव इत्यादी भागात आक्रमण केले. पण यावेळी हंबीररावाने मुघल सैन्याची पिछेहाट केली. मिरजेत असणारे 'रुहुल्लाखान' व 'रणमस्तखान' हे इ. स. १६८५ च्या डिसेंबरपूर्वी पन्हाळयापर्यंत गेले होते. पण दोघांचा हंबीररावाने चांगलाच समाचार घेतल्याने ते कोल्हापूराहुन बेळगावच्या बाजूला गेले.[२३]

औरंगजेबाने इ.स. १६८८ च्या जानेवारीमध्ये 'महमंद अझमशाहा' व 'खानबहादूर फिरुजजंग' याची संभाजीराजांवर रवानगी केली. अझमशहाने सैन्याची रवानगी कोल्हापूरच्या प्रांतात केली. 'शेख निजाम' आपल्या व अझमशहा यांच्या २५,००० सैन्यानिशी पन्हाळा घेण्यासाठी औरंगजेबाच्या आदेशानुसार संभाजीराजांचा प्रदेश घेत–घेत कोल्हापूरापर्यंत आला होता. तसेच मावळ, कल्याण व पन्हाळा या प्रदेशावर असणारे सैन्य सप्टेंबर इ. स. १६८८ पासून जमत होते.[२४]

इ. स. १६८८ ऑक्टोंबर–नोव्हेंबरच्या सुमारास संभाजीराजे रायगडावर होते. 'कविकलश' हा रायगडावर नसून तो पन्हाळा, मलकापूर व खेळणा या प्रदेशात होता.[२५]

मुघलांच्या एकूण कामगिरीवरुन ते मराठयांच्या साम्राज्यावर आक्रमण करणार हे स्पष्ट दिसत असताना शिर्क्यांनी संधी साधून बंड केले.[२६] सरदेसाईच्या मतानुसार कोंकणच्या प्रदेशाचे माहितीगार 'शिर्के' वगैरे सरदार औरंगजेबास मिळाले होते. औरंगजेबाने त्यांना कोकणात पाठवून त्यांच्याकडून बंडाची परिस्थिती निर्माण केली. यावेळी कविकलश व शिर्के यांच्यात संघर्ष निर्माण झाला. जेधे शकावलीत याबाबत असा उल्लेख केला आहे की, 'शके १६१० (इ.स. १६८८) कार्तिक मध्ये कविकलश याजवर शिर्के पारखे झाले' अशा परिस्थितीत कविकलशाने खेळण्याचा आश्रय घेतला. संभाजी महाराजांना ही घटना कळल्यावर ते रायगडावरुन कविकलशाच्या मदतीस आले. संगमेश्वरी जाऊन शिर्केबरोबर संघर्ष झाला त्यात शिर्केचा पराभव झाला.[२७]

शिर्केचा पराभव करुन संभाजीराजे पन्हाळगडावर परतले. तेथून रायगडावर जाण्याचा त्यांचा विचार होता. पण यावेळी पन्हाळयावरुन सरळ रायगडावर जाणे

त्यांना योग्य वाटले नसावे. कारण तो पर्यंत मुघल फौजा कोल्हापूरच्या प्रदेशात आल्या होत्या. गोवळकोंडा जिंकल्यानंतर औरंगजेबाने मुकर्रबखानाची नेमणूक कोल्हापूर प्रांतावर केली होती. औरंगजेबाने यावेळी अनेक सरदारांना आपल्या बाजूला वळविण्याचा प्रयत्न केला होता. यात हुक्केरीच्या देसाईला पत्र लिहून (डिसेंबर १६८८) आपल्या बाजूला घेण्याचा प्रयत्न केला होता. संभाजीराजांना या सर्व घटना पन्हाळगडावर कळाल्यामुळे त्यांनी पन्हाळा, कऱ्हाड, सातारा, वाई, महाड मार्गे रायगडावर न जाता पन्हाळयाहून संगमेश्वराला जाऊन तेथून चिपळूण,खेड मार्गाने रायगडावर जाण्याचे ठरविले असावे. संगमेश्वरचा रस्ता अवघड असल्याने त्यांनी हा मार्ग निवडल्याचे दिसते. संभाजीराजांचा मुक्काम संगमेश्वरला असताना शेख निजाम 'पन्हाळा' घेण्यासाठी कोल्हापूरपर्यंत गेला होता. संभाजीराजांना अटक करण्याची औरंगजेबाची इच्छा होती. व अशा परिस्थितीत बादशहाला नागोजी आणि शिर्के मंडळींनी ही संधी मिळवून दिली.[२८]

शेखनिजाम कोल्हापूरास असता त्याला संभाजीराजे संगमेश्वरात असल्याची बातमी मिळाल्याने तो संगमेश्वरी आला. मुकर्रबखानाचा मुलगा इख्लासखान याने संभाजी महाराजांना व कविकलश यांना अटक केली. त्यांच्या अटकेपासून सुमारे सव्वा महिन्यांने म्हणजे ११ मार्च १६८९ रोजी औरंगजेबाने संभाजीराजे व कविकलश यांचा शिरच्छेद केला.[२९]

## संभाजी महाराज व थोरातांची कमळा :–

छत्रपती संभाजी महाराज हे मराठयांच्या इतिहासातील मोठे वादग्रस्त व्यक्तिमत्व आहे. मराठी बखरकारांनी या व्यक्तिमत्वाचे विकृतीकरण केल्याने व पुढे या बखरीवर विसबूंन नाटक, चित्रपटात त्यांचा उपयोग केल्याने ते अधिकच वादग्रस्त बनले. अशातील काही नाटककारांनी संभाजीराजांची अनेक प्रेमपत्रे निर्माण करुन ती रंगमंचावर आणली. अशा नायिकेपैकी एक म्हणजे थोरातांची कमळा होय.

पन्हाळगडाच्या पायथ्याशी एक वास्तू समाधी मंदिर आहे. हे आता 'थोरातांच्या कमळेचे' मंदिर म्हणून दाखवले जाते. संभाजी महाराज व कमळा यांची भेट सज्जाकोठीत होत असे अशी कथा सांगितली जाते.

**थोरातांची थडगे :—**

पन्हाळयाच्या पायथ्याशी सज्जाकोटीच्या खाली 'आपटी' नावाचे गाव आहे. या गावाच्या दक्षिणेस अर्ध्या मैलावर शेतरानात ही थोरातांच्या कमळेची समाधी आहे. मु. ग. गुळवणी यांच्या मतानुसार 'जिवाची बिन शिदोजी थोरात' याच्या करीनात 'थोरातांच्या थडग्याचे' संदर्भ मिळाले. पण या करीन्यातील मजकूरापूर्वी ऐतिहासिक पार्श्वभूमी थोडक्यात मांडली आहे.[३०]

शाहू आणि ताराबाई यांच्यात इ. स. १७०७ पासून १७३१ पर्यंत जो संघर्ष घडला यात काही सरदार घराण्यांचा ही समावेश होता, त्यापैकी थोरात घराणे हे एक होय. 'दमाजी थोरात व 'यशवंतराव थोरात' यांचा कल करवीर छत्रपतीकडे असल्याने इ. स. १७१८ मध्ये शाहू महाराजांनी या थोरात बंधू विरुध्द मोहिम काढली.

थोराता मध्ये 'शिदोजी थोरात' व त्याचा पुतण्या 'यशवंतराव थोरात' पराक्रमी निघाले. यशवंतराव थोराताने शाहूचा पक्ष स्विकारला. पुढे सातारच्या शाहू महाराजांनी व यशवंतरावाने संभाजीराजांच्या वडगाव ठाण्यावर हल्ला केला व या ठिकाणच्या लढाईत संभाजीराजांना माघार घ्यावी लागली, व ते पन्हाळयास परतले. या लढाईच्या लुटीतील 'तखताचा हत्ती' आपणास मिळावा अशी यशवंतरावाची इच्छा होती, पण शाहूने नकार दिला.[३१] यामुळे यशवंतरावाने परत संभाजीराजांचा पक्ष स्विकारला. पुढे सातारकर व करवीरकर या संघर्षाच्या वेळी बाळाजी विश्वनाथ हा या स्वारीवर होता. या संघर्षात यशवंतरावाचा मृत्यू झाला. त्यावेळी त्याची पत्नी गोडाबाई सती गेली.[३२] ही घटना पन्हाळयाच्या पायथ्यांशी जिथे घडली तिथे थोरात घराण्यातील लोकांनी यशवंतराव व सती गोडाबाई यांचे संयुक्त—समाधी मंदिर उभारले. या मंदिराच्या गाभाऱ्यात या पती—पत्नीचे स्मारक म्हणून एक स्त्री—पुरुषाची पाषाण मूर्ती स्थापन केली. ही मूर्ती ढाल, तलवार आदि शस्त्रांनी सज्ज दाखविली आहे. हे समाधी मंदिर

३०'X१५'X२५' अशा विस्ताराचे असून बांधणी मजबूत आहे. मंदिराच्या सभोवताली कमळे व सुंदर शिल्पकलाकुसर आहे. समोर दोन दीपस्तंभ असून त्यामध्ये ६'X६' चा चौथरा आहे.[३३]

थोडक्यात पन्हाळयाच्या पायथ्याशी शिवपुत्र संभाजी महाराज यांच्या तथाकथित नायिकेचे म्हणून दाखविले जाणारे मंदिर हे मराठेशाहीतील एका–इतिहास प्रसिध्द घराण्यातील धारातीर्थी पडलेल्या वीर पुरुषाचे व त्याच्या पत्नीचे आहे ते थोरातांच्या कमळेचे वगैरे नसावे.

## राजाराम महाराजांचे मंचकारोहण :–

संभाजी महाराजांच्या अटकेच्यावेळी राजाराम महाराज रायगडावर नजरकैदेत होते. यावेळी राजाराम महाराजांना कैदेतून मुक्त करुन 'चांगोजी काटकर' व 'येसाजी कंक' यांनी इ. स. १६८९ मध्ये मंचकी बसविले त्यामुळे औरंगजेबाने या काळात आसदखानाचा पुत्र 'ईतिकदखान' याची मराठयांच्या मोहिमेवर रवानगी करण्यात आली.

खानाने मार्च १६८९ मध्ये रायगडास वेढा घातला. अशावेळी मोघलांना टक्कर देणे शक्य नव्हते. त्यामुळे सर्व सरदार मंडळीनी एकत्र येऊन विचार केला, त्यानुसार येसूबाईस रायगडावर ठेवून एप्रिल १६८९ मध्ये राजाराम महाराजांनी रायगडावरुन प्रतापगडावर प्रयाण केले.[३४] प्रतापगडावर राजाराम महाराजांचा मुक्काम दोन–अडीच महिने होता.[३५]

औरंगजेबाने या काळात मराठयांचे राजगड, रोहिडा, तोरणा हे किल्ले हस्तगत केले. तसेच कोंकणातील कल्याण, माहुली वगैरे ठिकाणे मोगलांच्या हाती पडली. राजाराम महाराजांना या गोष्टी प्रतापगडावर कळून धास्ती उत्पन्न झाली. अशावेळी बादशहाच्या फौजा प्रतापगडावर चालून येत असल्याचे कळाल्याने राजाराम महाराजांनी यावेळी प्रतापगड सोडून पन्हाळयावर आश्रय घेतला. त्यांचा मुक्काम जून ते सप्टेंबर १६८९ च्या दरम्यान पन्हाळगडावर असताना रायगडाला मोगलांचा वेढा पडला होता.[३६] यावेळी मोंगलांच्या फौजेवर आक्रमणाची कामगिरी 'रामचंद्र पंतानी'

'संताजी घोरपडे' आणि 'धनाजी जाधव' यांच्यावर सोपविली होती. राजाराम महाराज पन्हाळगडावर असल्याची बातमी मिळाल्याने 'शेख निजाम' पन्हाळयावर चालून येत होता. त्याचा पराभव करण्यासाठी 'संताजी' आणि 'धनाजी' यांच्या सैन्याचा निकराचा प्रयत्न चालला होता.

## राजाराम महाराजांचे पन्हाळयाहून जिंजीकडे प्रयाण :–

मोंगलापुढे निभाव लागणार नाही याची राजाराम महाराजांना जाणीव झाली असावी. म्हणून राजाराम महाराजांनी २६ सप्टेंबर १६८९ रोजी पन्हाळगड सोडला.[३७] राजाराम महाराज पन्हाळगड सोडण्यापूर्वी १०–१२ दिवस आधी म्हणजे १४ सप्टेंबर १६८९ ला मोगली सैन्याने पन्हाळगडाला वेढा घालण्यास सुरुवात केली होती.[३८]

राजाराम महाराज जिंजीला जाण्याबाबतचा उल्लेख व्हाईसरॉयच्या १६ जानेवारी १६९१ च्या पोर्तुगालचे राजास पाठविलेल्या हिंदूस्थानातील माहितीच्या अहवालात असा केला आहे, "मोगल बादशहाने संभाजीला पकडून त्याचा वध केल्यावर तो त्याच राज्य जिंकण्याच्या मार्गास लागला आहे. संभाजीचा भाऊ राजाराम हयाने पन्हाळयाच्या टेकडयांचा आश्रय घेतला होता. मोगलांनी पन्हाळयाला वेढा घालताच राजाराम तेथून निसटला व त्याने कर्नाटकच्या राणीच्या मुलुखांतून पुढे प्रयाण केले.......[३९]

राजाराम महाराज जिंजीस निघून जाताच रायगडच्या खालोखाल राजधानी सारखाच पन्हाळा किल्ला व त्याच्या जोडीचा पावनगड किल्ला इ. स. १६८९ च्या अखेरीस बादशहाने हस्तगत केला. पण यानंतर हा किल्ला परत मिळवण्याचा मराठयांनी प्रयत्न सोडला नाही. परशुरामपंताने सतत दोन वर्षे प्रयत्न करुन जून १६९२ मध्ये परत ताब्यात आणला.

## महंमद मुईझुद्दिनचा पन्हाळयास वेढा :–

औरंगजेबाने सतत तीन वर्षे पन्हाळयाचा ताबा मिळविण्यासाठी प्रयत्न केले. त्याचे नातू व दुसरे सरदार पन्हाळयास वेढा घालून बसले होते. पण परशुरामपंताने तितक्याच प्रयत्नाने किल्ला हातचा जावू दिला नाही.[४०] 'महंमद मुईझुद्दिन' याने

पन्हाळयास वेढा घातला होता. त्यावेळी माणकोजी, हिरोजी, बापूजी व प्रतापजी साठम यांनी राजाराम महाराजांना मदत केली म्हणून त्याचे पाटीलकीचे वतन पूर्ववत केले, त्याला देण्यात आलेल्या सनदेत उल्लेख करण्यात आला आहे, तो असा "........माणकोजी साठम व हिरोजी व बापुजी व प्रतापजी साठम नाईकवडी त ॥ मजकूर याही हुजूर येऊन विनंती केली की आपण पुरातन स्वामीचे सेवक बहुत दिवस क्ष्ट मशागत केली आहे. सांप्रत आपणास जमावानिसी पन्हाळयास पाठविले हाते. तेथे ही वेढयात यकनिष्ठपणे सेवा केली असे यास आपले वतन सरपाटेल की गाऊ आठ त ॥ मजकूरी होते त्या वतनास इनाम सेते........" हे पत्र २५ डिसेंबर १६९३ चे आहे. [४१]

पन्हाळयाच्या वेढयात काशी रंगनाथने मदत केल्याबद्दल छत्रपती राजारामाने त्यास 'सेबावणे' हा गाव इनाम दिला त्यातील उल्लेख असा, "...... सापंत किले पनाळेस मोगल गनिम मोजदिन (मुआझम) वेढा घालून बसला होता. त्या प्रसंगी कित्तेक स्वामी कार्यानिमित्व सेवा येकनिष्टपणे केली स्वामीचे पायासी येकनिष्ट बहुत या करिता तुम्हावर स्वामी कृपाळू होऊन मौजे सेबावणे तपे मलकापुर हा गाव नूतन इनाम करार करुन दिल्हा असे......."[४२]

माआसिर–इ–आलमगिरीतील वर्णनानुसार ८ मार्च १६९४ ला 'महमंद मुईझुद्दिन' पन्हाळयाचा वेढा उठवून बादशहाच्या भेटीस गेला.[४३]

औरंगजेबाने अनेक वर्षे प्रयत्न करुन ही त्याला पन्हाळगडाचा ताबा मिळविता आला नाही. यावेळी औरंगजेबाने पन्हाळगडाचा ताबा मिळवण्यासाठी पन्हाळगडाचा किल्लेदार 'परशुराम त्र्यंबक' याचे मन वळवून किल्ल्याचा ताबा मिळविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. "....... राजारामाचे किल्ले जिंकून घेवून त्याचा नायनाट करण्याचा उद्देशाने चालकरुन येत आहोत. लवकरच आमची छावणी मुर्तुजाबाद (मिरज) येथे कायम होइल..... तुमच्या किल्ल्यातील काही माणसे आम्हांला शरण येऊ पाहत आहेत. तुमच्या सुदैवाने सुबुध्दि होऊन तुम्ही किल्ला आमच्या हवाली करावा. तुम्ही असे केले तर बादशहाची विशेष कृपा होऊन तुम्हांला मोठा मानमरातब देण्यात येईल...... [४४]

वरील सर्व संदर्भ लक्षात घेता औरंगजेब बादशहाचे इ. स. १६९२ पासून पन्हाळगडाचा ताबा मिळवण्यासाठी अनेक वर्षे प्रयत्न केल्याचे दिसते. यावरुन मोंगल व मराठा या दोन्हीही पक्षांना 'पन्हाळगड' किती महत्वाचा होता हे लक्षात येते.

राजाराम महाराज जिंजीवरुन परत आल्यावर त्यांचा पन्हाळयावर मुक्काम होता. व तेथूनच शाहू व येसूबाई यांना सोडविण्यासाठी मोहिम काढण्याचा निर्णय घेण्यात आला होता. व त्यानुसार औरंगजेबाच्या छावणीवर हल्ला केल्याचा उल्लेख चिटणीस बखरीत करण्यात आला आहे. शाहू महाराजांना सोडविण्यासाठी राजाराम महाराजांनी धाडसी कृत्य केले पण त्याला यश आले नाही. यानंतर राजाराम महाराजांनी औरंगाबाद मुक्कामाहुन पुढे जालना, अंबड, पैठण, बीड यामार्गे प्रवास करुन शेवटी ते सिंहगडास येऊन पोहचले. पण साऱ्या प्रवासात त्यांच्या प्रकृतीवर वाईट परिणाम होऊन इ. स. १७०० मध्ये त्यांचा सिंहगडावर मृत्यू झाला. [४५]

## महाराणी ताराबाई – मराठयांचे स्वातंत्र्य युध्द :–

महाराष्ट्राच्या इतिहासात इ. स. १६८१ ते १७०७ या सव्वीस वर्षाच्या कालखंडाला 'मराठयांच्या स्वातंत्र्ययुध्दाचा कालखंड' असे समजले जाते. स्वातंत्र्ययुध्द काळात छत्रपती संभाजी, छत्रपती राजाराम व महाराणी ताराबाई असे तीन राज्यकर्ते मराठयांना लाभले.

महाराणी ताराबाईचे व्यक्तिमत्व प्रभावी होते आणि कार्यशक्ती मोठी होती. त्यांचा जन्म मोहित्यांच्या घराण्यात झाला. सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या त्या कन्या होत्या. त्या आठ वर्षाच्या असताना राजारामाशी त्यांचा विवाह झाला. मोगलांनी रायगडाला दिलेल्या वेढयातून त्या राजाराम महाराजांबरोबर ५ एप्रिल १६८९ रोजी रायगडावरुन प्रतापगडाला गेल्या व तेथून त्या ऑगष्ट १६८९ मध्ये निघून पन्हाळगडावर आल्या.[४६]

पुढे राजाराम महाराजांनी जिंजीचा प्रवास केला तेंव्हा त्यांच्यासह ताराबाई व राजघराण्यातील इतर मंडळी होती.[४७] राजाराम महाराज जिंजीहून परतल्यावर पुढे इ.

स. १७०० मध्ये त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर ताराबाईने मार्च १७०० मध्ये 'शिवाजीराजे' यांचे मंचकारोहन विशाळगडावर घडवून आणले.[४८]

### पन्हाळयावरील संघर्ष :—

औरंगजेबाने दक्षिण महाराष्ट्रात महत्वाचा गणला जाणारा 'पन्हाळगड' जिंकण्यासाठी तयारी सुरु केली. आधीच त्याने ऑगष्ट १७०० मध्ये शहजादा बेदरबस्त व जुल्फिकारखान यांना पन्हाळगड जिंकण्यासाठी रवाना केले होते. पण पावसामुळेच त्यांना पन्हाळयाच्या प्रदेशात हालचाली करणे शक्य नव्हते. पावसाळयानंतर त्यांनी डिसेंबर १७०० मध्ये मोर्चे बांधावयास सुरुवात केली. १७०१ मध्ये मराठयांचा जुल्फिकारखाना बरोबर पन्हाळयाच्या पायथ्याशी संघर्ष झाला यात मोगलांचा पराभव झाला. यानंतर मराठयांनी दररोज नवनवीन हल्ले करुन ठिकठिकाणी मोगली रसद बंद केली. त्यामुळे अन्नधान्याचे भाव भडकले. [४९]

पन्हाळा किल्ल्यावरही धान्याची तूट जाणवू लागली. पण या काळात पन्हाळयावर धान्य पुरविण्याची कामगिरी 'दादो मल्हारने' पत्करली. त्याच्या रसदीवर जुल्फिकरखानाने हल्ला चढविला होता, पण तरीही दादो मल्हारच्या प्रयत्नाने ही रसद पन्हाळगडावर २४ फेब्रुवारी १७०१ रोजी पोहचविण्यात आली. त्यामुळे हा किल्ला आणखी तीन महिने लढविणे शक्य झाले. [५०]

### औरंगजेब पन्हाळयाकडे :—

इ. स. १७०१ च्या जानेवारी—फेब्रुवारीत औरंगजेबाने मिरजेत मुक्काम केला. २ मार्चला मिरजेहून निघून ९ मार्च रोजी पन्हाळयाच्या पायथ्याशी आला. पन्हाळगडाला वेढा घालण्यासाठी किल्ल्याच्या अनेक बाजूवर सेनानींच्या नेमणूका करण्यात आल्या. यावेळी औरंगजेबाच्या लष्करात जुल्फिकारखान, तरबियतखान, रुहुल्लाखान, हमीबुद्दीनखान इत्यादी सेनानी होते. जुल्फिकारखानास मात्र वेढयाच्या कामात न राहता मराठयांच्या पाठलागावर जावे लागले. [५१]

मोगलांचे पन्हाळगडाचा ताबा मिळवण्यासाठी सततचे प्रयत्न चालले होते. मोगलांनी पन्हाळयाच्या प्रदेशात अनेक तोफा आणून त्या पन्हाळयाच्या तटबंदीवर

डागल्या जात होत्या, तसेच पन्हाळयाच्या तटबंदी खालून भूयारी मार्ग काढण्याचे प्रयत्न चालू होते. पण पन्हाळगडाचा ताबा मिळवण्यात त्यांना यश येत नव्हते. कारण मोगल सरदारांतील आपापसातील हेवेदाव्यांमुळे वेढयाचे काम रेंगाळत होते. यासंबंधी खाफीखान म्हणतो, 'बादशहाची दक्षिणेतील मोहिम जी इतकी लांबली त्याचे मुख्य कारण म्हणजे सरदारांतील मतभेद आणि त्यांच्यातील एकीचा अभाव हे होय. [५२]

## महाराणी ताराबाईचे किल्ला लढविण्याचे प्रयत्न :—

ताराबाईने मोगलांना पराभूत करण्यासाठी अनेक निकराचे प्रयत्न केले होते. औरंगजेबाने पन्हाळयास वेढा घातला तेंव्हा 'एसोजी साठम' व 'सुर्याजी साठम' या दोन मराठा सरदारांना पन्हाळयाकडे रवाना केल्याचे संदर्भ कागदोपत्रात मिळतात. प्रांत राजापूरच्या देशाधिकाऱ्यास ताराबाई लिहितात, "राजश्री एसोजी बिन बावजी साठम व सुर्याजी बिन रामजी साठम पदात पंचचारी यास अवरंगजेब वेढा घालून बसला ते प्रसंगी जमावनिशी उभयंतानी किल्ले राखोन मरदमगीची शर्त केली...... सांप्रत मशारनिल्हेस किल्ले पनालियास जमावानिशी नामजाद पाठविले आहेत. स्वामीचे शेवेशी तिळमात्र अंतर करत नाहीत......."(२६ जानेवारी १७०१)[५३] तसेच माणकोजी, हिरोजी, बापुजी व प्रतापजी साठम बंधूनी पन्हाळयास जाऊन आपल्या 'तरवारेची शर्त केली' ......[५४] असा एका पत्रात उल्लेख मिळतो. यातून ताराबाईचे पन्हाळा किल्ला लढविण्याचे प्रयत्न चालल्याचे दिसतात.

## पन्हाळा—पावनगड काबीज :—

'महमंद मुरादखान' आणि 'फत्तेउल्लाखान' यांच्या सारखे काही सरदार प्रामाणिकपणे वेढयाच्या कामात झटत होते. तोफांच्या माऱ्याने पन्हाळा किल्ल्याचे पाच बुरुज निम्या उंचीपर्यंत उडवून लावण्यात आले होते. तसेच पन्हाळगडच्या तटबंदीत मोगलांनी दोन मोठे सुरुंग खोदले होते. पण पावसाळा जवळ येत असल्याने औरंगजेबाला किल्ला लवकर मिळवणे आवश्यक वाटत होते. शेवटी शहजादा 'कामबक्ष' आणि 'तरबियतखान' यांनी मराठयांशी वाटाघाटी करुन किल्ला ताब्यात घेण्याचा प्रयत्न सुरु केला. या काळात मोगलांनी किल्ला घेण्यास प्रयत्न केले कि

सुरुवातीस त्यांना विरोध करुन पुढे त्यांच्याकडून पैसे घेऊन किल्ला ताब्यात दयावयाचा व ते माघारी फिरताच परत घ्यावयाचा असे मराठयांचे धोरण होते. शेवटी तरबियतखानांच्या प्रयत्नाला यश आले आणि मराठयांनी पन्हाळा व पावनगड हे किल्ले ५५ हजार रुपये घेऊन बादशहाच्या स्वाधीन केले, (२८ मे १७०१) यानंतर बादशहाने पन्हाळयास 'नबीशहादुर्ग' असे नवीन नाव दिले. व 'इस्माइल खानमखा' याची पन्हाळयाचा किल्लेदार म्हणून नियुक्ती करण्यात आली. [५५]

एकदंरीत सर्व संदर्भावरुन असे लक्षात येते की, राजाराम महाराजांच्या मृत्युनंतर ताराबाईच्या हातात राज्याधिकार असताना औरंगजेबाने पन्हाळगडाचा ताबा मिळविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली, पण शेवटी हा गड ताब्यात न आल्याने त्याने हा गड मराठयांकडून पैसे देवून विकत घेतला.

इ. स. १७०७ मध्ये औरंगजेब बादशहा मृत्यू पावला. इ. स. १६८१ पासून दक्षिणेत तो स्वतः मराठयांच्या विरुध्द मोहिमेत राहिला. तेंव्हापासून तो सतत सव्वीस वर्षे दक्षिणेत मराठयांशी झगडत राहिला पण मराठयांच्या सत्तेचा शेवट करण्यात तो अयशस्वी ठरला.

औरंगजेबाच्या मृत्युनंतर महाराणी ताराबाईने दोन तीन महिन्यातच मोगली किल्लेदाराकडून सिंहगड, पुरदंर, पन्हाळगड, विशाळगड, सातारा, परळी हे महत्वाचे किल्ले परत मिळवले[५६] अशा प्रकारे मोगलांकडून पन्हाळगडाचा ताबा परत मराठयांकडे आला.

## छ. शाहू–ताराबाई संघर्ष :–

इ. स. १७०७ मध्ये औरंगजेबाच्या मृत्यूनंतर महाराणी ताराबाईने मोगलांच्या ताब्यातील अनेक किल्ले परत मिळवले. धनाजीने पुणे व चाकण ही ठिकाणे परत मिळवली. अशा काळात मोगलांनी शाहूस आपला मांडलिक बनवून त्याची सुटका करण्यात आली की जेणे करुन महाराणी ताराबाई व शाहू यांचा संघर्ष निर्माण होऊन मराठयांचे साम्राज्य कमकुवत बनेल.

शाहूच्या सुटकेनंतर ताराबाई आणि शाहू यांच्यात मराठ्यांच्या छत्रपती पदासाठी संघर्ष निर्माण झाला. यातून इ. स. १७०७ मध्ये ताराबाई आणि शाहू यांच्यात 'खेडची' लढाई घडून आली, व यात ताराबाईचा पराभव झाला. यानंतर शाहूने साताऱ्यावर आक्रमण करण्याचे ठरविले. त्यामुळे ताराबाईनी साताऱ्याच्या संरक्षणाची जबाबदारी प्रतिनिधीवर सोपविली आणि त्या पन्हाळगडावर निघून आल्या, शाहूने खेडपासून साताऱ्यापर्यंत विजय मिळवले. राजाराम महाराजांनी निर्माण केलेली सातारा ही राजधानी शाहूने ताब्यात घेतली.

महाराणी ताराबाई आणि शाहू यांच्यात यादवीचे नवे पर्व इ. स. १७०८ नंतर सुरु झाले. शाहूमहाराजांनी स्वतःचा राज्याभिषेक करुन आपल्या छत्रपती पदाची द्वाही फिरवली. पण ताराबाईना हे अमान्य होते त्यांच्या मते, त्यांचे पुत्र 'शिवाजी महाराज' हेच छत्रपती आहेत. या काळात दोन्ही पक्षांचे छोटे–मोठे संघर्ष सातारा आणि पन्हाळा यांच्या दरम्यानच्या प्रदेशात चालूच होते.[५७] शाहू महाराजांनी ताराबाईचा पूर्ण पराभव करण्यासाठी पन्हाळयाच्या प्रदेशात सैन्याची व सहकाऱ्यांची तयारी सुरु केली होती.

शाहू महाराजांनी चंदन, वंदन किल्ल्यावर व ताराबाईने कोल्हापूरच्या प्रदेशात फौज जमा केली. शाहू महाराजांनी पन्हाळगड व विशाळगड घेण्यासाठी पन्हाळयाच्या प्रदेशात मोर्चे बसविले. त्यामुळे महाराणी ताराबाईला पन्हाळगड सोडून रांगण्याचा आश्रय घ्यावा लागला. त्यामुळे शाहू महाराजांना पन्हाळगड व पावनगड यांचा ताबा मिळाला. यानंतर महाराजांनी पन्हाळयावर ठाणे निर्माण करुन कोल्हापूर प्रांतावर आपला अंमल निर्माण केला.[५८]

पुढे शाहू महाराजांनी रांगण्यावर आक्रमण केल्याने महाराणी ताराबाई व शिवाजी यांना मालवणला जावे लागले. यानंतर शाहूने रांगणा मिळवण्यासाठी तीन महिने प्रयत्न केले. पण रामचंद्रपंत अमात्य आणि सेनापती पिराजी घोरपडे यांच्या विरोधामुळे त्यांना हा गड मिळवता आला नाही. त्यामुळे आपल्या सैन्यासह छ. शाहू पन्हाळयाकडे परतले आणि पूर्ण पावसाळा त्यांनी पन्हाळगडावर काढला. शाहूराजे पन्हाळगडावर असताना त्याचे सेनापती धनाजी जाधवांचा मृत्यू झाल्याने शाहूंच्या पक्षाला मोठा धक्का बसला. यानंतर शाहूराजे साताऱ्यास परतले या संधीच फायदा

घेऊन महाराणी ताराबाईनी पन्हाळा किल्ला परत मिळवण्यासाठी प्रयत्न केले. पन्हाळयाचा किल्लेदार जो महाराणी ताराबाईनी सुरुवातीस नेमला होता, तोच शाहूराजांनी पुढे कायम केला होता. महाराणी ताराबाईनी पन्हाळयावर मोहिम काढली तेंव्हा या किल्लेदाराने जास्त प्रतिकार केला नाही व परसोजी भोसले याचा प्रतिकार ताराबाईने मोडून काढला आणि पन्हाळगडाचा व कोल्हापूरचा प्रदेश ताराबाईने परत मिळविला.[५९] अशा प्रकारे पन्हाळा आणि कोल्हापूर ही दक्षिणेकडील मोक्याची ठिकाणे महाराणी ताराबाईने परत मिळवली.

## पन्हाळा : मराठयांच्या राजधानीचे दुसरे ठिकाण :—

रामचंद्रपंतानी पन्हाळा, रांगणा आणि सभोवतालच्या प्रदेशातील गड किल्ल्यांचा बंदोबस्त करुन शिवाजीराजे यांची सत्ता या प्रदेशावर मजबूत करण्याचे धोरण आखले. इ. स. १७०८ मध्ये शाहू महाराजांनी पन्हाळयाहून साताऱ्याला जाताना महाराणी ताराबाईच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी परसोजीला फौजेनिशी मागे ठेवले होते. पण ताराबाईच्या फौजेपुढे परसोजीचा निभाव लागणे शक्य नव्हते. इ. स. १७०९ मध्ये परसोजी मृत्यू झाला. ही परिस्थिती महाराणी ताराबाईच्या दृष्टीने अतिशय अनुकूल होती. तिचा फायदा घेऊन त्यांनी इ. स. १७१० मध्ये पन्हाळयाला शिवाजीमहाराज यांच्या छत्रपतीपदाची द्वाही फिरवली. या घटनेने छत्रपतींची राजधानी सातारा नसून पन्हाळा आहे हे सिध्द करावयाचे होते.[६०] महाराणी ताराबाईचा पुत्र शिवाजी याचा उल्लेख कोल्हापूरचे पहिले छत्रपती शिवाजी महाराज असा इ. स. १७१० नंतर होवू लागला.

अशा प्रकारे पन्हाळयाला कोल्हापूर राज्याची राजधानी होण्याचा मान मिळाला ही राजधानी पुढे इ. स. १७८८ पर्यंत पन्हाळयाला राहिली.

## समारोप :—

छत्रपती शिवरायांच्या काळात किल्ल्यांना अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले. दक्षिणेकडील पन्हाळगड हा किल्ला शिवरायांच्या काळात एक महत्वपूर्ण किल्ला म्हणून गणला गेला. छत्रपती संभाजीराजे यांच्या आयुष्यातील अनेक प्रसंग हे

पन्हाळगडाच्या साक्षीने घडले. राजाराम महाराजांनी जींजीच्या प्रवासाआधी पन्हाळगडाचा आश्रय घेतला होता. महाराणी ताराबाईनी औरंगजेबाशी जो यशस्वी संघर्ष दिला त्यात पन्हाळगडाचा वाटा महत्वपूर्ण होता. इ. स. १७१० मध्ये महाराणी ताराबाईने कोल्हापूर राज्याच्या गादीची स्थापना पन्हाळगडावर केली त्यामुळे पन्हाळगडाला मराठयांची दुसरी राजधानी होण्याचा मान मिळाला व ही राजधानी इ. स. १७८८ पर्यंत पन्हाळगडावर राहिली.

**संदर्भग्रंथ सूची :—**


१) मोडक बा. प्र. — कोल्हापूर प्रांताचा अर्वाचीन इतिहास, पृ. ६.

२) सरदेसाई गो. स. — मराठा रियासत, खंड १, पृ. २८६.

३) बेंद्रे वा. सी. — श्री छत्रपती संभाजी महाराज, पृ. ५७ — ५८.

४) कित्ता — पृ. ४३५.

५) सरदेसाई गो. स. — मराठी रियासत, खंड २, पृ. २० — २१.

६) कित्ता — पृ. २० — २१.

७) सरदेसाई गो. स. — मराठी रियासत, खंड १, पृ. ३३६.

८) डॉ. गोखले क. — शिवपूत्र संभाजी, पृ. ६७ — ६१.

९) सरदेसाई गो. स. — मराठी रियासत, खंड १, पृ. ३३८ — ३३९.

१०) गोखले क. — शिवपूत्र संभाजी, पृ. ७० — ७१.

११) बेंद्रे वा. सी. — उपरोक्त, पृ. ९२ — ९९.

१२) सरदेसाई गो. स — उपरोक्त, पृ. ३४१.

१३) बेंद्रे वा. सी — उपरोक्त, पृ. ७०.

१४) सरदेसाई गो. स. — उपरोक्त, पृ. ३४१.

१५) कित्ता — पृ. ३४२ — ३४३.

१६) गोखले क. — उपरोक्त, पृ. ७९.

१७) सरदेसाई गो. स. — मराठी रियासत, खंड २, पृ. २३.

१८) बेंद्रे वा. सी. – उपरोक्त, पृ. १२२.

१९) गोखले क. – उपरोक्त, पृ. ८२ – ८७.

२०) कित्ता – उपरोक्त, पृ. ९५ – १००.

२१) कित्ता – पृ. १०० – १०१.

२२) बेंद्रे वा. सी. – उपरोक्त, पृ. ४०५ – ४०६.

२३) गोखले क. – उपरोक्त, पृ. ३०३ – ३०४.

२४) बेंद्रे वा. सी. – उपरोक्त, पृ. ४६० – ४६१.

२५) गोखले क. – उपरोक्त, पृ. ४६०.

२६) कित्ता – पृ. ४६२.

२७) सरदेसाई गो. स. – मराठी रियासत, खंड २, पृ. १०९.

२८) गोखले क. – उपरोक्त, पृ. ४६३ – ४६५.

२९) सरदेसाई गो. स. – उपरोक्त, पृ. ११० – ११२.

३०) डॉ. पवार ज. – छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ, पृ. ३०६.

३१) कित्ता – पृ. ३०७ – ३०८.

३२) राजवाडे वि. का, (संपा.) – मराठयांच्या इतिहासाची साधने, खंड ३, पृ. ४५३.

३३) पवार ज. – उपरोक्त, पृ. ३०९.

३४) सरदेसाई गो. स. – उपरोक्त, पृ. १५३ – १५४.

३५) पवार ज. – महाराणी ताराबाई, पृ. २९.

३६) सरदेसाई गो. स. – उपरोक्त, पृ. १५५.

३७) पवार ज. – उपरोक्त, पृ. २७ – ३०.

३८) बेंद्रे वा. सी. – श्री छत्रपती राजाराम महाराज, पृ. ७०.

३९) कित्ता – पृ. ४०.

४०) सरदेसाई गो. स. – मराठी रियासत, खंड २, पृ. १७६.

४१) डॉ. पवार अप्पासाहेब, (संपा.) – ताराबाईकालीन कागदपत्रे , खंड १, पृ. ५५८.

४२) कित्ता – पृ. ५१.

४३) बेंद्रे वा. सी. – उपरोक्त, पृ. २४३.

४४) पगडी से. मा, (संपा.) – मोगल–मराठी संघर्ष, पृ. ७२.

४५) गर्गे स. मा. – करवीर रियासत, पृ. ४१.

४६) कित्ता – पृ. ६५.

४७) पवार ज. – उपरोक्त, पृ. ३७.

४८) कित्ता – पृ. ८७ – ८८.

४९) कित्ता – पृ. १३५ – १३६.

५०) गर्गे स. मा. – उपरोक्त, पृ. ५२.

५१) पवार ज. – उपरोक्त, पृ. १३६.

५२) कित्ता – पृ. १३८.

५३) पवार अप्पासाहेब. – उपरोक्त, पृ. ५६१.

५४) कित्ता – पृ. ५६३.

५५) पवार ज. – उपरोक्त, पृ. १४१ – १४२.

५६) कित्ता – पृ. २३८.

५७) गर्गे स. मा. – उपरोक्त, पृ. ७०.

५८) मोडक बा. प्र. – उपरोक्त, पृ. २६.

५९) गर्गे स. मा. – उपरोक्त, पृ. ७५.

६०) कित्ता – पृ. ११० – १११.